# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/03/2023 (शनिवार) दुपार

---

## विनयभंग

पो.स्टे. मौदा :— दिनांक २३.०३.२०२३ चे २१.३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय २४ वर्ष हि किराणा दुकान येथे भांडे घासायची साबण आणण्या करीता गेली. साबण व चीप्स चे पाकीट घेवुन वापस येत असता आरोपी नामे— अवि श्रिसागार रा संघटीत नगर डहाळी ता. मौदा जि नागपुर हा तिथुन जात असता ''क्या माल आहे'' असे म्हटले असता मी त्याला तुझा घरी मा—बहीन नाही का? असे म्हटले असता आरोपीने केस पकडुन हातबुक्याने मारहान केली व खाली रोड वर पाडले तेव्हा फिर्यादीची सासु व पति आले व त्यांनी भांडण सोडविले नंतर आरोपी हा तिथुन निघुन गेला. आरोपीने फिर्यादीचा विनयभंग केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३२३ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनी पिंपळकर पोस्टे मौदा मो. नं. ८४२१९५६०६६ हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत १० कि.मी अंतरावरील मौजा कोठोडी शिवार येथे दिनांक २२.०३.२०२३ चे १४.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सचिन चंद्रपाल शर्मा, वय ३९ वर्ष, रा. कोराडी जिल्हा नागपूर हे आपल्या स्कार्पीओ गाडीने कोठोडी गावातुन कोलमाईन्स येथे जात असता अचानक गायीच्या पिल्याला धडक लागल्याने यातील आरोपी नामे— १) विजय भूजाडे, २) शूभम कोहळे ३) शरद टेकाडे, ४)राजू बोबडे, ५)शुभम परनामी, ६) प्रथमेश भूजाडे ७) निखील ठाकरे व ईतर लोक सर्व रा. कोठोडी सावनेर यांनी संगणमत करून कोठोडी माईन्स खदान येथील उभे असलेले डंपर व स्कार्पीओ गाडी यांवर दगडफेक केली त्यामुळे गाडयांचे काचे फुटली व अंदाजे २२,००,०००/—रू. चे नुकसान झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, ४४७, ४२७, १४९, ५०४, ५०६, ५०७ भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्री निशांत फुलेकर पोस्टे सावनेर मो.क्र ७५८८५६४३०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर